**F.No.11-10/2014-IA-III dated 12 मार्च 2015**

# नाटे विलेज, राजापूर तालुका, जिल्हा रत्नागिरी, महाराष्ट्र येथे कॅप्टीव आणि तृतीय पक्षकार कार्गो साठी बंदराचा विकास

**इआयए (पर्यावरणात्मक परिणाम अहवाल) आणि इएमपी अहवालाचा कार्यकारी सारांश**

**प्रकल्पाचे समर्थक**

I Log Ports Pvt. Ltd.


मेसर्स आय लॉग पोर्टस् प्रा. लि.
विश्वकर्मा 86सी, टॉपसीया रोड (दक्षिण)कोलकाता–700046
फोन नं: +91 33 66027734 फॅक्स: +91 33 22857542 /8501
ईमेल: ilog.ports@gmail.com


**पर्यावरण विषयक सल्लागार**


भगवती एना लॅब्स प्रायव्हेट लिमिटेड
(ए ब्युरो वेरिटास ग्रुप कंपनी)
एनएबीइटी/इआयए/1619/आरए0049
7–2–सी–14,इंडस्ट्रीयल इस्टेट, सनथनगर
हैद्राबाद 500018
040–23811535/1545/0505


सप्टेंबर 2018

# कार्यकारी सारांश

## 1.0 प्रस्तावना

मेसर्स आय लॉग पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड (आयएलपीपीएल) हा एसआरईआय इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स लिमिटेड, कोलकाताचा उपक्रम असून त्यांनी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यात असलेल्या नाटे गावात कॅप्टिव्ह बंदर बांधण्याचा प्रस्ताव दिला आहे. हे बंदर कॅप्टीव आणि तृतीय पक्ष कार्गो साठी टप्प्याटप्प्याने विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. टप्पा 1 मध्ये कार्गोची हाताळणी क्षमता 5.0 एमटीपीए असेल आणि अंतिम क्षमता पुढील टप्प्या 2 मध्ये 10.0 एमटीपीए आहे. भूखंडाचा खर्च वगळता अंदाजित सुरुवातीचा प्रकल्प खर्च 135 कोटी रूपये आहे.

हा प्रकल्प प्रस्ताव एमओईएफअँडसीसी, नवी दिल्लीच्या तज्ञ मान्यता समितीने (ईएसी) 28 जानेवारी 2015 रोजी झालेल्या सभेमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट आणि मिसलेनियस प्रोजेक्ट्स अँड सीआरझेडसाठी प्रस्ताव क्रमांक आयए/एमआयएस/एमएच 23794/2014 द्वारे 28 जानेवारी, 2015 रोजी झालेल्या सभेमध्ये विचारात घेतला होता. मान्यताप्राप्त टीओआर संदर्भ पत्र क्र. एफ. क्र. 11–10/2014–आयए–III दिनांक 12 मार्च 2015, टीओआर वाढीव कालावधी दिनांक 22 मार्च 2018 आणि टीओआर दुरूस्ती दिनांक 31 ऑगस्ट 2018 जारी करण्यात आला होता. हा प्रकल्प ईआयए अधिसूचना दिनांक 14/09/2006 नुसार ''7ई'' प्रकार ''अ''मध्ये मोडतो. तसेच देशातील तसेच प्रदेशातील व्यावसायिक परिस्थितीत झालेले बदल लक्षात घेऊन त्यानुसार काम करताना कंपनीला असे वाटले की, सर्व समभागधारकांनी आपले लक्ष स्वच्छ कार्गो आणि अधिक स्वच्छ इंधनावर ठेवले पाहिजे. त्याचा परिणाम म्हणून या प्रकल्प घटकाला कार्गो प्रोफाइलला बदलत्या तत्वज्ञानाशी जोडून बंदर विकसित करण्यास आवडेल. आता, औद्योगिक केंद्र स्थापित करण्याचा विचार असून त्यातून खालील कार्गोचा वापर करण्यात येईल.

खते, साखर, बॉक्साइट, कोळता, कच्चे लोखंड, सिमेंट, सिमेंट क्लिंकर, जिप्सम, दगडी फॉस्फेट, स्टील, स्टील रचना, अभियांत्रिकी माल, क्रूड पामतेल, रिफाइन्ड खाद्यतेल इत्यादी, पेट्रोलियम उत्पादने, पेट्रोकेमिकल्स, केमिकल्स, बल्क आणि ब्रेक बल्क कंटेनरसह, एलपीजी, एलएनजी यांच्यासारखे द्रवरूप हायड्रोकार्बन वायू इत्यादी.

टप्पा 1– आकारमान एकूण 5.0 एमटीपीए
घन– 1.25 एमटीपीए, द्रवरूप– 1.25 एमटीपीए, वायू– 2.5 एमटीपीए

टप्पा 2 ची पूर्तताः आकारमान एकूणः 10.0 एमटीपीए
घनः 2.5 एमटीपीए, द्रव 2.5 एमटीपीए, वायूः 5.0 एमटीपीए

त्यानुसार, आयएलओजी पोर्ट्सनी टीओआरच्या दुरूस्तीसाठी अर्ज सादर केला आहे आणि त्याला पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने 2–4 जुलै 2018 रोजी आयोजित केलेल्या 32 व्या तज्ञ मान्यता समितीच्या (इन्फ्रा–2) सभेत मान्यता दिली आहे.

## 2.0 प्रकल्पाची थोडक्यात माहिती

ही प्रस्तावित बंदर पहिल्या टप्प्यात 100 हेक्टर क्षेत्रावर बांधण्यात येणार असून प्रकल्प पूर्ण झाल्यावर एकूण क्षेत्रफळ 428.515 हेक्टर असेल. उद्योग संचालनालयाने महाराष्ट्र औद्योगिक विकास धोरणानुसार प्रस्तावित बंदराच्या प्रकल्पासाठी भूखंड खरेदी करण्यासाठी मान्यता दिली आहे.

प्रकल्पाच्या सुविधेच्या बांधकामाची अंमलबजावणी खाली नमूद केल्याप्रमाणे चार टप्प्यांमध्ये केली जाईल.

- टप्पा 1– भाग गाळउपसणी/भराव (रेक्लमेशन) यांच्यासह चांगल्या हवामानात मोठ्या प्रमाणावर कार्गोसाठी एक बर्थ आणि साठवणुकीची जागा.
- टप्पा 2– सुमारे 500 मीटर लांबीवर दक्षिण ब्रेकवॉटर
- टप्पा 3– सुमारे 500 मीटरवर दक्षिण ब्रेकवॉटर विस्तार

- टप्पा 4– मोठ्या प्रमाणावरील आणि सर्वसाधारण कार्गो हाताळणीसाठी अतिरिक्त साठवणूक क्षेत्रासह अतिरिक्त बर्थ (धक्का) किनारपट्टी पासून अंदाजे 700 मीटर्स अंतरावर बांधण्यात आला आहे.

**प्रस्तावित कॅप्टिव्ह बंदराची प्रमुख वैशिष्टे**

| अनु क्र. | वैशिष्टे | तपशील |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावित आकारमान | टप्पा–1: 1.50 एमटीपीए अंतिम क्षमता 10.0 एमटीपीए |
| 2. | प्रवेश वाहिनीसाठी किमान रूंदी | 200 मीटर |
| 3. | डिझाइन शिप आकार | 80,000 डीडब्ल्यूटी जहाजे |
| 4. | ब्रेक वॉटर | दुसऱ्या टप्प्यात दक्षिणेकडे सुमारे 1000 मीटर ब्रेकवॉटर |
| 5. | बर्थची लांबी आणि रूंदी | 250 मीटर लांब आणि 40 रूंद |
| 6. | टर्निंग सर्कल खोली | –15 मीटर |
| 7. | टर्निंग सर्कल व्यास | 600 मीटर |
| 8. | साठवणुकीचे क्षेत्र आणि बंदरावर आधारित उद्योगासाठी क्षेत्र | भरावद्वारे विकसित होणारे क्षेत्र वगळता सुमारे 100 हेक्टर |
| 9. | बर्थ प्लॅन | पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात एक ऑफ शोअर बंदर आणि त्यानंतर दोन अतिरिक्त बर्थस |
| 10. | सुविधांसाठी बॅक अप भूखंड क्षेत्र आवश्यकता | फेज:1 100 हेक्टर<br>प्रकल्प पूर्ण झाल्यावर 428.515 हेक्टर |
| 11. | सुविधा | साइट विकास, साधनसुविधा आणि प्रशासकीय इमारत |
| 12. | प्रस्तावित प्रकल्प खर्च | पहिल्या टप्प्यातील भूखंडाचा खर्च वगळून सुरुवातीचा अंदाजे खर्च रु. 135 कोटी रूपये |
| 13. | पाण्याची आवश्यकता | राज्य जल मंडळाकडून दररोज 140 एम3, जीवन प्राधिकरण |
| 14 | विजेची आवश्यकता | फेज – 1 0.9 मेगावॉट<br>अंतिम आवश्यकता 2 मेगावॉट<br>स्त्रोतः महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) |
| 15. | रोजगारनिर्मिती | बांधकामाच्या टप्प्यातः प्रत्यक्ष रोजगार 20, अप्रत्यक्ष रोजगार 200<br>कार्यान्वयनाच्या टप्प्यात– प्रत्यक्ष रोजगार 50, अप्रत्यक्ष रोजगार 300 |
| 16. | हरित पट्टा विकास | 33 टक्के प्रकल्प क्षेत्र हरित पट्ट्यासाठी |

बर्थ किनारपट्टीच्या रेषेपासून 700 मीटरपर्यंत बांधण्यात येईल.

प्रस्तावित बंदराच्या बांधकाम आणि कार्यान्वयनाचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

- बंदराच्या बांधकामासाठी खोदकाम करणे.
- कार्यान्वयन क्षेत्रासाठी रेक्लमेशन
- प्रवेश मार्गाचे बांधकाम
- कोरडा बल्क कार्गो, साखर, द्रव कार्गो इत्यादी चढवणे/ उतरवणे
- कोरडा बल्क कार्गो, साखर, द्रव कार्गोचा साठा इत्यादी साठवणे
- कोरडा बल्क कार्गो, साखर द्रव कार्गोचा साठा इत्यादींची वाहतूक

**3.0** प्रस्तावित साइटच्या 10 किलोमीटरच्या अंतरात पर्यावरणीय परिस्थिती

प्रस्तावित प्रकल्पाच्या साइटच्या 10 किमी अंतरावर पर्यावरणीय परिस्थिती खाली नमूद केल्याप्रमाणे आहे

प्रस्तावित प्रकल्प साइटची पर्यावरणीय परिस्थिती

| अनु क्र. | विषय | तपशील | |
|---|---|---|---|
| 1. | प्रकल्प | कॅप्टीव आणि तृतीय पक्षकार कार्गो साठी 10.0 एमटीपीए क्षमतेच्या बंदराचा विकास | |
| 2. | कार्गो हाताळणी क्षमता | 10.5 एमटीपीए | |
| 3. | ठिकाणाचे तपशील | गावे : नाटे<br>तहसील : राजापूर<br>जिल्हा : रत्नागिरी<br>राज्य : महाराष्ट्र<br>हे ठिकाण कोकण किनारपट्टीच्या रत्नागिरी जिल्हयाच्या दक्षिण भागात आहे. | |
| 4. | प्रस्तावित क्षेत्र | 428.515 हेक्टर | |
| 5. | पडताळणी वर्गवारी | 7ई– ''ए'' | |
| 6. | प्रकल्पाचा खर्च | भूखंडाचा खर्च वगळता 135 कोटी रूपये | |
| 7. | भौगोलिक स्थान | अक्षांश | रेखांश |
| | | $16^{0}38'54''$ उत्तर – $16^{0}.39'30''$ उत्तर | $73^{0}19'45''$ पूर्व – $73^{0}20'00''$ पूर्व |
| 8. | साइटची सध्याची उंची | एमएसएलवर 26 ते 28 मीटर उंच | |
| 9. | जवळचा महामार्ग | प्रकल्पाच्या साइटपासून इएसईवर 4 किलोमीटर अंतरावर राज्य महामार्ग 4 धावतो. | |
| 10. | जवळचे रेल्वेस्थानक | साइटपासून 20 किमी अंतरावर कोकण रेल्वे मार्गावरील राजापूर रेल्वे स्थानक आहे. | |
| 11. | जवळचा विमानतळ | रत्नागिरी (40 किमी उत्तर)<br>मुंबई (370 किमी एनएनई) | |
| 12. | जवळचे जलक्षेत्र | अरबी समुद्र (लागून असलेला)<br>अर्जुना नदी (3.5 किमी, एसएसई)<br>नाटे खाडी | |
| 13. | जवळचे गाव/शहर/निमशहरी भाग (घनतानिहाय क्षेत्रे) | जवळचे गाव आंबुळगड असून ते प्रस्तावित बंदरापासून 1 किमी अंतरावर आहे आणि सर्वाधिक घनतेचे शहर रत्नागिरी आहे जे प्रकल्पाच्या साइटपासून सुमारे 40 किमी हवाई अंतरावर आहे. | |
| 14 | डोंगर/ दऱ्या | नाही | |
| 15. | वन्यजीव संरक्षण कायदा 1972 नुसार संरक्षित क्षेत्रे, हत्ती अभयारण्य, जैवअभयारण्य, नॅचरल पार्क, वन्यजीव अभयारण्य, समाज अभयारण्ये आणि संवर्धन अभयारण्ये | वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार संरक्षित क्षेत्रे नाहीत, तथापि भारदे गाव (4.5 किमी) हा एमओईएफ पत्र संदर्भ क्रमांक एफ. क्रमां. 1–4/2012– आरई (पीटीद्ध / दिनांक 13. 11.2013 नुसार पर्यावरणदृष्टया संवेदनशील क्षेत्र (इएसए) आहे. | |
| 16 | भूकंपक्षमता | झोन –3 (आयएस 1983– भाग 1: 2002 नुसार) | |

## 4.0 प्रकल्पाचे स्थानिक फायदे

नाटे गावाजवळील हा प्रस्तावित प्रकल्प खालील फायद्यांवर आधारित साधनसुविधांच्या विकासासाठी अत्यंत सुयोग्य आहेः

- या ठिकाणाला एक टिकाऊ सागर वैज्ञानिक (ओशनोग्राफिक) फायदे आणि चांगल्या रितीने काम होण्यासाठी शांत भागही आहे.
- रस्ते आणि रेल्वेने योग्यरित्या जोडलेले.
- किनाऱ्यापासून 2–3 किमीच्या अंतरावर खोल पाणी आणि त्यामुळे गाळउपसणी कमी होते.
- या भूखंडावर पडीक जमीन आहे आणि झाडे नाहीत.
- लोकवस्ती नसल्यामुळे पुनर्वसनाची आवश्यकता नाही.
- प्रस्तावित प्रकल्प साइटपासून 25 किमीच्या अंतरावर कोणताही उद्योग स्थापित नाही.
- कोल्हापूर (सांगली आणि सातारा) साखर आणि औद्योगिक पट्ट्याच्या जवळ स्थित आणि रत्नागिरी, कोल्हापूर आणि बेळगाव पट्ट्यांसाठी तसेच सोलापूर आणि करीमनगर यांच्यासाठी सर्वांत जवळचे बंदर.
- कृषी आणि औद्योगिक उत्पादनांसाठी कार्गो हालचालीसाठी मोठी क्षमता.

5.0 पर्यावरणाची माहिती

अभ्यास क्षेत्रः प्रकल्प साइटपासून 10 किमीच्या वर्तुळात

अभ्यास कालावधीः 2015 चा उन्हाळा मान्सून पूर्व 2015 आणि मान्सून 2018

5.1 हवामानाची माहिती

| | उन्हाळा |
|---|---|
| वाऱ्याचा वेग | 2.1–3.6 |
| वाऱ्याची दिशा | वायव्य |
| तापमान | 43.8–25.6 अंश सेल्सियस |
| सापेक्ष आर्द्रता | 86 टक्के |

5.2 परिसरातील हवेचा दर्जा

अभ्यास क्षेत्रातील परिसर हवा दर्जा सर्वेक्षणासाठी मूलभूत अभ्यास आठ मॉनिटरिंग स्टेशन्सची निवड करून करण्यात आला आहे. परिसर हवा दर्जाचे तपशील खाली दिल्याप्रमाणे आहेत.

अभ्यास कालावधी 98 टक्के (ug/m3) टप्प्यात परिसर हवा दर्जाचा सारांश

| ऋतू | $PM_{10}$ | $PM_{2.5}$ | $SO_2$ | $NO_X$ | CO | $O_3$ | Pb | $NH_3$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मान्सून पूर्व 2015 | 51-58.5 | 18.8-21.5 | 11.4-12.5 | 17-18.3 | <0.01 | 18.6-21.2 | <0.01 | 23.6-28.3 |
| मान्सून पूर्व 2018 | 47.8-54.0 | 18.2-22.5 | 10.7-17.0 | 15.0-24.6 | 3.2-5.2 | 16.1-24.1 | <0.01 | 20.0-25.2 |
| एनएएक्यू स्टँडर्ड्स एन्युअल/ 24 तास | **100** | **60** | **80** | **80** | **24** | **100** | **1.0** | **400** |

5.3 परिसरातील आवाज पातळी

वरील निष्कर्षांवरून असे दिसते की दिवस समकक्षता आणि रात्रीची समकक्षता हे दोन्ही निवासी क्षेत्रांसाठीच्या एम्बियन्ट आवाज दर्जाच्या मर्यादेतच होते.

| | N1 | N2 | N3 | N4 | N5 | N6 | N7 | N8 | N9 | N10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| किमान | 34.2 | 35.2 | 33.8 | 36.1 | 37.1 | 36.5 | 36.7 | 36.9 | 37.0 | 34.2 |
| कमाल | 52.1 | 53.0 | 48.9 | 49.7 | 50.3 | 50.1 | 51.2 | 51.4 | 51.2 | 52.1 |
| एलडी | 46.6 | 47.2 | 45.2 | 46.0 | 46.1 | 46.2 | 46.7 | 47.3 | 47.8 | 46.6 |
| एलएन | 43.8 | 42.6 | 43.9 | 44.6 | 44.2 | 43.8 | 44.6 | 41.9 | 48.9 | 46.2 |
| सीपीसीबी मानके दिवस/ रात्र | 75/70 | दिवस 55 डीबीए आणि रात्री 45 डीबी (ए) | | | | | | | | |

**5.4** जल वातावरण

- अभ्यास क्षेत्रातून 8 भूमिगत आणि 6 पृष्ठभागावरील पाण्याचे नमुने गोळा करून अभ्यास कालावधीदरम्यान पाण्याचा दर्जा तपासण्यात आला.
- भूमिगत पाण्याचा दर्जा पिण्याच्या पाण्याच्या दर्जानुसार (आयएसः 10500) परवानगीयोग्य मर्यादेमध्येच असल्याचे दिसले आहे.
- पृष्ठभागावरील पाण्याचा दर्जा सामान्यतः समुद्रातील पाण्याच्या दर्जाचे प्रतिनिधित्व करतो.

**5.5** मृदेचा दर्जा

प्रमुख क्षेत्र तसेच बफर क्षेत्रांमधून मातीचे सात नमुने गोळा करण्यात आले होते.

- गोळा केलेल्या मृदेचा सामू 6.2– 7.8 च्या दरम्यान होता.
- जलधारणा क्षमता 39–55 टक्क्यांच्या आसपास आहे.

- ऑर्गेनिक मॅटर टक्केवारी 3.9– 5.3 मिलिग्रॅम/ लिटर
- सर्व नमुन्यांमध्ये एन, पी आणि के यांच्यासारखे पोषक घटक सर्वसाधारण स्वरूपात आहेत.

**5.6** भूवापर

अभ्यास क्षेत्रात

- टाकाऊ जमीन– 39 टक्के
- पाणथळ जागा– 48.75 टक्के
- कृषी जमीन– 10 टक्के
- वनक्षेत्र– शून्य

**5.7** जैवशास्त्रीय वातावरण

अभ्यास क्षेत्रात वैविध्यपूर्ण निवासाचा समावेश असून त्यातून पक्षी, सरपटणारे प्राणी, सस्तन प्राणी यांच्या विविध प्रजाती आणि इतर प्राणीही आहेत.

अभ्यास क्षेत्रात अभ्यास कालावधीदरम्यान पक्ष्यांच्या 102 विविध प्रजाती आढळल्या. यातील अनेक प्रजातील आयडब्ल्यूपीए 1972च्या सूचि–4 अंतर्गत येतात तर इंडियन–पाइड हॉर्नबिल, स्पॉटेड ऑलेट, व्हाइट बेलीड सी इगल आणि इंडियन पीफॉल हे डब्ल्यूपीए–1972च्या सूची–1 मध्ये वर्गवारी केले आहेत.

**5.8** सामाजिक आर्थिक वातावरण

अभ्यास क्षेत्रात सुमारे 57 गावे आहेतः

- एकूण लोकसंख्या – 34472
- पुरूष – 15646, स्त्रिया – 18826
- पुरूष ते स्त्री प्रमाण – 1000 : 831
- पुरूष साक्षरता दर – 36.6 टक्के
- स्त्री साक्षरता दर – 35.9 टक्के
- शेतकरी – 6012
- शेतमजूर – 4971
- घरगुती कामगार – 383
- इतर कामगार – 4640
- एकूण सीमान्त कामगार – 10146
- एकूण अत्यल्प कामगार – 5860
- एकूण बिगर कामगार – 18466
- अनुसूचित जाती लोकसंख्या – 1.1 टक्के
- अनुसूचित प्रजाती लोकसंख्या – 0.3 टक्के

**5.9** सीआरझेड क्षेत्रे

ही बंदर आयबी, 3 आणि 4ए, एलटीएल, एचटीएल या सीआरझेड क्षेत्रांमध्ये येते.

- सीआरझेड प्रदेश नकाशा इन्स्टिट्यूट ऑफ रिमोट सेन्सिंग (आयआरएस), अण्णा युनिव्हर्सिटी चेन्नई, तामिळनाडू यांनी तयार केला आहे.

**6.0** बांधकाम आणि कार्यान्वयन टप्प्यातील परिणाम आणि व्यवस्थापनाचा आराखडा

| विषय | संभाव्य परिणाम | संभाव्य स्त्रोत | उपशमन उपाययोजना |
|---|---|---|---|
| बांधकामाच्या दरम्यान परिणाम | | | |
| पाण्याचा दर्जा | मुसळधार पावसात माती वाहून | बांधकामाच्या ठिकाणी | लँडस्केपिंग आणि मोठ्या प्रमाणावर झाडे |

| | | | |
|---|---|---|---|
| | जात असल्यामुळे मृदेचे घर्षण होते. | ठिसूळ माती | लावली जातील. |
| हवेचा दर्जा | धूळ आणि एनओएक्स संयुगामध्ये वाढ | लेव्हलिंगचे काम आणि वाहनांची मोठी वर्दळ | बांधकामाच्या ठिकाणी पाण्याची फवारणी<br>बनवण्यात न आलेले रस्ते<br>वाहनांची योग्य देखभाल |
| आवाज | आवाजाच्या पातळीत वाढ | बांधकाम उपकरणे | उपकरणे चांगल्या स्थितीत ठेवून आवाजाची पातळी 90 डेसिबल (ए) मध्ये ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.<br>कामगरांना आवश्यक ते संरक्षण साहित्य दिले जाईल. जसे इयर प्लग, इयरमफ्स इत्यादी. |
| परिसरातील जैववैविध्यता | झाडे पडणे. | मातीमधील काम. | लँडस्केपिंग आणि मोठ्या प्रमाणावर झाडे लावली जातील. |
| समुद्री वातावरण | बायोटा आणि पाण्याचा दर्जा खराब होणे. | ब्रेकवॉटर रचनांचा विकास, कालवे खोदणे | पाण्याचे नमुने तपासून खळबळ आणि पाण्यातील विषारी द्रव्यांवर नीट लक्ष ठेवले जाईल. |
| आर अँड आर परिणाम नाही | | | |
| कार्यान्वयनाच्या टप्प्यातील परिणाम | | | |
| पाण्याचा दर्जा | पृष्ठभागावरील पाण्याच्या दर्जात घसरण | विविध एककांमधून उत्सर्जन | |
| पर्यावरण | | | |
| अ. पृष्ठभागीय | वनसंपदेवर परिणाम | ऊत्सर्जन | |
| ब. सागरी | भेन्थिक आणि मेओ संपदेवर परिणाम | बंदराच्या कार्यान्वयनातून उपचार केलेले सांडपाणी | सांडपाण्यावर योग्य ते उपचार केले जातील आणि त्याचा वापर हॉर्टिकल्चरसाठी केला जाईल. |
| आवाज | बंदराच्या विभागात आवाजाच्या पातळीत वाढ | उपकरणे आणि संबंधित साहित्य | नियामक एजन्सींनी घालून दिलेल्या नियमांनुसार आवाजाच्या पातळ्यांवर काम करण्यासाठी उपकऱणे सज्ज केली जातील. हरित पट्टा आणि वृक्षारोपण यांच्यामुळे आवाज आणखी कमी होण्यास मदत होईल. मोठ्या आवाजाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना इयरप्लग्स/ इयरमफ्स एक संरक्षक साधन म्हणून दिले जातील. |
| लोकसांख्यिक आणि सामाजिक आर्थिक | गृहनिर्माण, जलस्त्रोत आणि स्वच्छता, वैद्यकीय आणि दळणवळणाच्या विद्यमान सुविधांवर ताण | प्रस्तावित बंदरासाठी लोकांची वाढती वर्दळ | स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य दिले जाईल. प्रकल्पाच्या घटकासाठी अतिरिक्त दळणवळणाच्या सुविधा दिल्या जातील. |

## 7.0 पर्यावरणीय उपाययोजनांवरील खर्च

- पर्यावरणीय उपाययोजनांचा खर्च– 7 कोटी रूपये
- प्रकल्पानंतरचे मॉनिटरिंग एमओईएफ आणि सीसी, सीपीसीबी आणि एमएसपीसीबी यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रकल्पानंतरचे मॉनिटरिंग केले जाईल.

## 8.0 कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर)

आयएलपीपीएल आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या माध्यमातून सामाजिक साधनसुविधा विकसित करण्याचा आणि प्रस्तावित साइटच्या आसपासच्या परिसरात स्थित गावांमधील लोकांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न करेल. सीएसआर माहितीचा विचार करता, आयएलपीपीएल सुमारे 2 टक्के तरतूद सीएसआरसाठी करत आहे.

- बंदराच्या क्षेत्रातील आरोग्य सुविधा गावकऱ्यांसाठी उपलब्ध असतील.
- मच्छिमार समुदायासाठी विकास उपक्रम
- शालेय विकास
- स्थानिक गावकऱ्यांसाठी कौशल्य विकास.